# सामाजिक आर्थिक व जात सर्व्हेक्षण-2011 अंतर्गत जाहीर नोटीस

सामाजिक आर्थिक व जात सर्व्हेक्षण-2011 अंतर्गत लातूर जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व्हेक्षणाचे काम पुर्ण झाले असून त्याची प्रारूप प्रसिध्दि **दिनांक 08/01/2015** रोजी जिल्हयाअंतर्गत शहरी भागासाठी नगर परिषद/ महानगरपालिका व ग्रामीण भागात ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच प्रारूप यादीची प्रत पंचायत समिती , नगर परिषद , महानगरपालीका व जिल्हास्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा येथे उपलब्ध असणार आहे. सदरील यादीतील तपशीला बद्दल काही आक्षेप दाखल करावयाचे असल्यास त्यांनी आपल्या ग्रामपंचायत तसेच नगरपालिका / महानगरपालिका येथे पदनिर्देशित अधिका-यांकडे यादी प्रसिद्ध झाल्यापासून म्हणजेच **दिनांक 08/01/2015** पासून या संबंधी आक्षेप / दावे हरकती ग्रामीण भागासाठी 30 दिवस व शहरी भागासाठी 21 दिवस पर्यंत विहीत अ , ब , क ,ड ,इ प्रपत्रात दाखल करणेबाबत सदरील जाहिर नोटीस देण्यात येत आहे.

**<u>नमुना अ)</u>** प्रारूप यादी मध्ये प्रसिद्ध केलेल्या माहितीवर आक्षेप दाखल करण्याबाबतचा नमुना

**<u>नमुना ब)</u>** प्रसिद्ध केलेल्या प्रारूप यादीमधील माहितीच्या तपशिलाची सुधारणा / फेरबदल करण्याबाबतचा नमुना

**<u>नमुना क)</u>** प्रगणनेच्या वेळी वगळलेल्या / राहण्याच्या नेहमीच्या ठिकाणापासुन दुर गेलेल्या कुटूंबाचा सामावेश करण्यासाठीचा नमुना

**<u>नमुना ड)</u>** आक्षेप घेतलेल्या / दावे केलेल्या व्यंक्तींना नोटीस नमुना

**<u>नमुना इ)</u>** ग्रामसभेच्या बैठकीमध्ये ठरविल्याप्रमाणे सामाजिक - आर्थिक व जात निहाय जनगणना 2011 च्या प्रसिद्ध केलेल्या माहितीच्या प्रारूप यादीमध्ये अभिप्राय / ठराव दाखल करण्याबाबतचा नमुना

आक्षेपा नुसार विहीत प्रपत्रामध्ये माहिती भरून यादी प्रसिद्धीच्या ठिकाणी असणारे पंचायत/ वार्ड लेवल ऑफिसर (PLO) यांच्या कडे दाखल करता येतील व त्याच वेळी सुनावणीची तारीख व वेळ देण्यात येईल . सदरील प्राप्त अर्ज प्रथम अपिलीय अधिकारी ग्रामीण भागासाठी गट विकास अधिकारी व नगरपालीका क्षेत्रासाठी मुख्यअधिकारी व महानगरपालीका क्षेत्रासाठी क्षेत्रीय अधिकारी हे आहेत.

ग्रामीण व नगर पालीका क्षेत्रासाठी उपविभागीय अधिकारी व महानगर पालीका क्षेत्रासाठी उपआयूक्त हे द्वितीय अपिलीय अधिकारी म्हणून कार्य करतील.

आपील कर्त्याने सूनावणीच्या वेळी पुराव्यासह हजर राहून आपली बाजू मांडावी . मुदतीनंतरचे दावे व हरकती स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी .

दावे व आक्षेप संदर्भात विहीत नमून्यातील अर्ज अ, ब, क, ड, इ हे ग्रामीण भागासाठी संबंधित ग्राम पंचायत, पंचायत समिती स्तर व जिल्हा स्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा लातूर येथे आणि शहरी भागासाठी नगरपालिका तथा महानगर पालीका व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा लातूर येथे उपलब्ध आहेत.

दि. 2. 1. 2015

(स्वाक्षरी)

अध्यक्ष
जिल्हास्तरीय समिती,
सामाजिक आर्थिक व जात सर्व्हेक्षण-2011
तथा जिल्हाधिकारी लातूर